आजचा रंग
करडा/ग्रे

जनमानसाचा निडर आवाज...

पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक । वर्ष १ । अंक ७७ । शनिवार, २७ सप्टेंबर २०२५ | मूल्य : २ रु. | पाने : ४

RNI NO - MAHMAR/2022/84210

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

संक्षिप्त

पुण्यात पुन्हा बुलडोझर पॅटर्न!

पुणे, ता. २६ : पुणे पोलिसांनी स्वारगेट गुन्हेगारांविरोधात आक्रमक भूमिका घेतली असून, त्यांच्या अवैध साम्राज्यावर थेट बुलडोझर फिरवण्याची मोहीम सुरू केली आहे. अदिकर टोळीनंतर आता कात्रजपेठ परिसरातील कुख्यात गुंड रिझवान उर्फ टिपू सत्तार पठाण यांच्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करून ते जमीनदोस्त करण्यात आले. रिझवानवर खंडणी, मारहाण आणि दहशत पसरवण्यासह अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. अनेक गुन्हेगार तुरुंगातून जामिनावर सुटून पुन्हा गुन्हेगारीकडे वळतात. याला आळा घालण्यासाठी पोलिसांनी फक्त अटक करून न थांबता त्यांच्या अवैध संपत्तीवरही कारवाई करण्याचे धोरण अवलंबले आहे. आर्थिक कंबरडे मोडल्याशि पुन्हा साम्राज्य उभे करणे कठीण होईल, असा पोलिसांना विश्वास आहे. 'पुन्हा केल्यास पुन्हा उभे राहणे शक्य नाही' ही भीती गुन्हेगारांच्या मनात निर्माण करण्यासाठी पुणे पोलिसांचा हा बुलडोझर पॅटर्न महत्वपूर्ण ठरणार आहे.

ड्रोनच्या सहाय्याने दारू अड्ड्यांवर छापे

पुणे, ता. २६ : पुणे पोलिसांनी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून अवैध दारूच्या धंद्यावर धडक कारवाई केली आहे. परिमंडळ ४ मध्ये बुधवारी (२४ सप्टेंबर) पहाटेपासून सुरू झालेल्या विशेष मोहिमेत ड्रोनच्या साहाय्याने हातभट्टी दारू निर्मिती आणि विक्री करणाऱ्या ठिकाणांवर छापे टाकण्यात आले. या मोहिमेत पोलिसांनी १३ व्यक्तींवर ११ गुन्हे दाखल केले असून, ७८ लिटर हातभट्टीची दारू आणि ६०० लिटर कच्चे रसायन जप्त केले आहे. जप्त केलेल्या मालाची किंमत तब्बल ४९ हजार ५० रुपये असून त्यात १६,३०० रुपयांची दारू आणि २८,००० रुपयांचे रसायन समाविष्ट आहे. अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी पोलिस उपायुक्त सोमय मुंढे यांच्या आदेशानुसार ही मोहीम राबवण्यात आली. १८ अधिकारी व ६० कर्मचाऱ्यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वी केली.

तीन लाचखोर महिला तलाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात

हवेली महसूल विभागात खळबळ, खडक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल..

पुणे, ता. २६ : पश्चिम हवेलीतील सांगरुण,बहुली व खडकवाडी-कुडजे या गावातील तीन महिला तलाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात एकाचवेळी अडकल्या आहेत. हस्तलिखित सातबारा, संगणकीकृत सातबारा व आठ अ उतारा यासाठी शासकीय शुल्काच्या व्यतिरिक्त लाचेची मागणी केल्याचे उघडकीस आले आहे. एका महिला तलाठ्याला २ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले आहे. तिन्ही महिला तलाठ्यांवर खडक पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे हवेली महसूल विभागात एकच खळबळ उडाली आहे.

शारदादेवी पुरुषोत्तम पाटील (वय ४०,तलाठी खडकवाडी कुडजे, हवेली, पुणे रा.ठि. सर्व्हे न. ५७/१, कृष्णकुंज सोसायटी, मोरे वस्ती, सोलापूर रोड, पुणे यांत्री बुद्रुक) असे सीहाथ लाच स्वीकारलेल्या महिला तलाठ्याचे नाव आहे. प्रेरणा बबन पारधी (वय ३०, तलाठी सांगरुण, हवेली पुणे रा ठि. फ्लॅट न. ७ऽ, २/४A, जी सेव्हायटी, गुलमोहर पार्कजवळ, पाषाण, पुणे) व दिपाली दिलीप पासलकर (वय २९, तलाठी बहुली,हवेली, पुणे रा.ठि. लेन न.४, स्वामी समर्थनगर, कोंढवा, काकडेनगर, पुणे ४८) या दोन महिला तलाठ्यांवर लाचेच्या मागणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी एका ४२ वर्षीय पुरुषाने लाचलुचपत प्रतीबंधक विभागाकडे तक्रार केली होती.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे जमीन खरेदी विक्रीचा व्यवसाय करतात. त्यांना सांगरुन, बहुली, खडकवाडी आणि कुडजे (ता. हवेली) या गावाच्या हद्दीतील जमीन खरेदी विक्री करण्यासाठी पुणे शहराच्या लगतच्या प्रस्तावित रिंग रोड मध्ये अधिग्रहित झालेल्या जमिनीच्या सातबारा तसेच आठ अ उताराचे संगणकीकृत तसेच हस्तलिखित साक्षांकित प्रत हव्या होत्या. त्यासाठी ते सांगरुण येथे कार्यरत असलेल्या तलाठी प्रेरणा पारधी, बहुली येथील तलाठी दिपाली पासलकर व खडकवाडी कुडजे येथील तलाठी शारदा देवी पाटील यांना भेटले. त्यावेळी सांगरुण गावातील तक्रारदार यांना आवश्यक असलेल्या सातबाराच्या व आठ अ उताऱ्याच्या २४० प्रतीसाठी तलाठी पारधी यांनी सरकारी फी व्यतिरिक्त १६,४०० रुपयांची लाचेची मागणी केली होती.

बहुली गावातील आवश्यक असणाऱ्या सातबाराच्या व उताऱ्याच्या आवश्यक असणाऱ्या १०६ प्रतिसाठी संबंधित गावचे तलाठी दिपाली पासलकर यांनी शासकीय शुल्काच्या व्यतिरिक्त ४ हजार ९१० रुपयांची लाच मागितली होती. खडकवाडी व कुडजे गावातील तलाठी शारदा देवी पाटील यांनी सातबाराच्या व उताऱ्याच्या एकूण ३२ प्रतिसाठी सरकारी शुल्काच्या व्यतिरिक्त १५२० रुपयांच्या लाचेची मागणी तक्रारदार यांच्याकडे केली होती. याप्रकरणी तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती.

मिळालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने, १९ सप्टेंबरला पडताळणी केली असता, खडकवाडी कुडजे येथील शारदादेवी पाटील यांना सातबाऱ्याच्या व आठ अ उताऱ्याच्या ३२ प्रतिसाठी सरकारी फी रक्कम ४८० रुपये होत असताना, पाटील यांनी तक्रारीपूर्वी तक्रारदाराकडून १ हजार ५००रुपये स्वतःसाठी घेतल्याचे कबूल करून आणखी २ हजार रुपयांच्या लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. शारदादेवी पाटील यांना हवेली तहसीलदार यांच्या कार्यालयासमोरील रस्त्यावर तक्रारदाराकडून दोन हजार रुपयाची लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले.

सांगरुण गावाच्या प्रेरणा पारधी यांनी सातबाराच्या व उताऱ्याच्या २४० प्रतीसाठी ३ हजार ६०० रुपये होत असताना, तक्रारदार यांच्याकडून तक्रारीपुर्वी ४ हजार रुपये स्विकारून आणखी १२ हजार ४०० रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचे तपासात उघडकीस आले आहे. बहुली येथील तलाठी दिपाली पासलकर यांच्याकडे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी केली असता तक्रारदार यांना १०६ सातबाराच्या व उताऱ्याच्या प्रती पाहिजे होत्या, त्यासाठी सरकारी फी १ हजार ५९० रुपये होत होते. परंतु, त्यांनी पासलकर यांनी तक्रारदाराकडे ६ हजार ५०० होत असून सांगरुण गावाच्या तलाठी प्रेरणा पारधी यांच्याकडे ती रक्कम देण्यास याँगितल्याचे निष्पन्न झाले आहे.

दरम्यान, तिन्ही आरोपींच्या घरझडतीसाठी पथके तात्काळ रवाना करण्यात आलेले आहेत. घरझडतीची प्रक्रिया सुरु असून या तिघींच्या विरोधात खडक पोलीस ठाण्यात लाचेचा व लाच मागणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस निरीक्षक शैलजा शिंदे करीत आहेत.

जोतिचंद भाईचंद ज्वेलर्स आता उरुळी कांचनमध्ये...!

हनुमंत चिकणे

उरुळी कांचन, ता. २६ : २०० वर्षांची परंपरा व विश्वास जपणाऱ्या जोतिचंद भाईचंद ज्वेलर्स यांच्या नवीन शाखेचे भव्य उद्घाटन उरुळी कांचन (ता. हवेली) येथे झाले. या प्रसंगी बिग बॉस फेम जान्हवी किल्लेकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. यावेळी सार्थक सेवा संघ, आंबले गाव (पुणे) येथील अनाथ आश्रमातील बालिकांसोबत हा सोहळा विशेषरित्या पार पडला, तसेच ज्वेलर्सतर्फे संस्थेला ५१ हजार रुपयांची मदत देण्यात आली.

या कार्यक्रमाला संचालक स्वप्निल शहा, मुकुलिका शहा, अंशुमालिन शहा तसेच उरुळी कांचन ग्रामपंचायतीच्या सरपंच ऋतुजा कांचन उपस्थित होते. पारंपरिक ढोल-ताशा, स्मार्ट प्रज्वलन, मान्यवरांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार अशा थाटामाटात सोहळा पार पडला. त्यानंतर जान्हवी किल्लेकर यांनी ग्राहकांना भेट दिली.

दरम्यान, आकर्षक दागिने, आधुनिक डिझाईन्स, भव्य दालन व पुरेशी पार्किंगची सोय अशा उत्तम सुविधा घेऊन जोतिचंद भाईचंद ज्वेलर्स आता उरुळी कांचनकरांच्या सेवेत दाखल झाले आहे. या उद्घाटनाच्या निमित्ताने २५ हजार व त्यापेक्षा जास्त दागिन्यांच्या खरेदीवर मिळवा २४ कॅरेट सोन्याचं नाणं मोफत व प्रत्येक खरेदीवर हमखास गिफ्ट देण्यात येणार आहे. त्यामुळे ग्राहकांनी लवकरात लवकर या शाखेला भेट देऊन आकर्षक व ग्राहकप्रिय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

एमपीएससीची परीक्षा पुढे ढकलली; आता 'या' तारखेला होणार परीक्षा

पुणे, ता. २६ : महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे येत्या रविवारी म्हणजे २८ सप्टेंबर २०२५ रोजी होणारी नागरी सेवा राज्यपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा अखेर पुढे ढकलण्यात आली आहे. राज्यभरात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मराठवाडा, खानदेश, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत पूरस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर उमेदवारांकडून तसेच विविध राजकीय प्रतिनिधींनी परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी केली होती.

हवामानशास्त्र विभागाने पुढील पाच दिवस राज्यात, विशेषतः मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. विदर्भात तर ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळे आधीच्या पावसामुळेच त्रस्तांत मोठा अडथळा आलेल्या उमेदवारांना आता परीक्षेत बसणे कठीण झाले होते. गेल्या एका आठवड्यापासून पावसाने राज्यात थैमान घातले आहे. या परिस्थितीत परीक्षा घेणे उमेदवारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अवघड ठरणार असल्याचे निरीक्षण व्यक्त होत होते.

आयोगाने या संपूर्ण परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर परीक्षेच्या तारखेबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला. आयोगाने जाहीर केले की राज्यसेवा पूर्व परीक्षा २८ सप्टेंबर रोजी होणार नाही.

पान ४ वर

संपूर्ण महाराष्ट्र साठी विजेत्याही संपी लकी ड्रॉ द्वारे * ऑफर 4 ऑक्टोबर ते 31 ऑक्टोबर 2025 पर्यंत वैध आहे

सोनालीका ट्रॅक्टरचे अधिकृत विक्रेता द्वारे

आर.एस.जी. ट्रॅक्टर्स

(युनिट ऑफ आर. एस. जी. सप्लायचेन सोल्युशन प्रा. लि.)

कृपया संपर्क साधा- हवेली शाखा - 9307446077। खेड शाखा - 9604214379

पुरंदर शाखा - 8888815548। भोर शाखा - 8482888575

भूमीपुत्रांना भूमिहीन करुन प्रकल्प लादू नये - डॉ. अमोल कोल्हे

तळेगाव-आळंदी म्हातोबाची रेल्वे प्रकल्पाबाबत ठाम भूमिका

पुणे, ता. २६ : स्थानिक भूमिपुत्रांची वर्षानुवर्षे नांदत असलेली घरे मोडून, त्यांना भूमिहीन करून तळेगाव ते आळंदी म्हातोबाची रेल्वे प्रकल्प लादू नये, अशी ठाम भूमिका खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी आज मध्य रेल्वेचे महाप्रबंधक धर्मवीर मोणा यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत मांडली. त्याचबरोबर जगभरात रेडिओ टेलिस्कोपच्या परिसरात १९ प्रकल्प रेल्वे प्रकल्प यशस्वीरीत्या सुरू असताना पुणे नाशिक रेल्वेमार्गावरच जीएमआरटी प्रकल्पाचे कारण का पुढे केले जाते असा सवाल करीत मूळ आराखड्यानुसारच हा रेल्वेमार्ग करण्याची मागणी केली.

तळेगाव ते आळंदी म्हातोबाची दरम्यान नवीन रेल्वेमार्ग उभारण्याच्या प्रस्तावाविरोधात शेतकऱ्यांच्या तीव्र भावना लक्षात घेऊन खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी आज मध्य रेल्वेचे महाप्रबंधक धर्मवीर मोणा यांची भेट घेतली. यावेळी झालेल्या चर्चेत डॉ कोल्हे यांनी विकास व्हायला हवा पण स्थानिक नागरिकांना विश्वासात न घेता आणि भूमिपुत्रांची वर्षानुवर्षे नांदत असलेली घरे मोडून, त्यांना भूमिहीन करून हा प्रकल्प लादू नका, अशी मागणी केली.

वेगाने होणारे शहरीकरण आणि रस्ते वाहतुकीवरील वाहतूक कोंडीचा ताण विचारात घेऊन पुणे दौंड मार्गावर रेल्वे प्रवासी वाहतुकीला उपनगरीय दर्जा देण्याबाबत प्राधान्याने विचार करावा अशी आग्रही सूचना त्यांनी या बैठकीत मोणा यांच्याकडे केली.

गेली अनेक वर्षांपासून रखडलेल्या पुणे नाशिक रेल्वे प्रकल्पाबाबत भूमिका मांडताना खासदार डॉ. कोल्हे यांनी जगभरात रेडिओ टेलिस्कोपच्या परिसरात १९ रेल्वे प्रकल्प यशस्वीरीत्या सुरू असल्याचे स्पष्ट केले.

पान २ वर